शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
वर्धा येथे सुरु करण्यात आलेल्या ४३० खाटांच्या
रुग्णालयाकरीता आवश्यक पद निर्मितीबाबत

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक : पदनि २६२३/प्र.क्र.२४४/२०२३/वैसेवा-१
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
तारीख: १२.०३.२०२४

वाचा:-
१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमईडी-२०२२/ प्र.क्र.२२९/२२/ शिक्षण-१, दिनांक १४.०७.२०२३.
२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक : DMER-१२०११ / १६/२०२२-EDU, दिनांक १७.०८.२०२३

प्रस्तावना :-

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार १००० लोकसंख्येमागे राज्यात डॉक्टरांचे प्रमाण कमी असल्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागातील व सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टरांची बहुतांशी पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्याच्या निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेस आरोग्यविषयक प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात अडचणी निर्माण होतात. राज्याच्या लोकसंख्येत झालेली वाढ आणि वैद्यकीय शिक्षणाबाबत तसेच आरोग्य सुविधेबाबत निर्माण झालेली जागरुकता लक्षात घेऊन पालघर, ठाणे (अंबरनाथ), जालना, अमरावती, बुलढाणा, वाशिम, वर्धा, भंडारा आणि गडचिरोली या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्हांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १४.०७.२०२३ निर्गमित करण्यात आला आहे.

२. उक्त शासन निर्णयान्वये ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यास संलग्नित रुग्णालयांसाठी आवश्यक ८८७४ पदांची निर्मिती करण्यास व पदे भरण्यास तसेच त्यापोटी येणाऱ्या रु.३८०.६१ कोटी इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर पदनिर्मितीस उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेची अट देखील शिथील करण्यात आली आहे. त्यानुसार वर्धा येथील १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास संलग्नित ४३० खाटांच्या रुग्णालयासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या व भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक ९८६ पदांच्या पदनाम निहाय पदनिर्मितीस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, वर्धा येथे सुरु करण्यात आलेल्या ४३० खाटांच्या रुग्णालयाकरीता विवरणपत्र “अ” नुसार गट-अ ते गट-क मधील नियमित ५२० पदे त्याचप्रमाणे विवरणपत्र “ब” बाह्यस्त्रोताने घ्यावयाच्या ४६६ मनुष्यबळ सेवा ४ टप्प्यात निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केलेली प्रथम, द्वितीय, तृत्तीय व चतुर्थ टप्पातील पदे टप्पा निहाय मंजूर होणार असून, प्रथम वर्षाबाबतची पदे तात्काळ निर्माण होतील व उर्वरित द्वितीय, तृत्तीय व चतुर्थ टप्यातील पदे प्रती वर्षी निर्माण होतील. विवरणपत्र “ब” बाबत तशीच कार्यवाही करण्यात येईल.

२) सदर पदांच्या वेतनाकरीता संस्था निहाय लेखाशिर्ष व आहरण संवितरण सांकेतांक मंजूर करुन घेण्यात यावे.

३) पुढील टप्प्यांच्या वेतनाची तरतूद संस्थेच्या प्रती वर्षीच्या अंदाजपत्रकात करण्यात यावी.

४) पुढील टप्प्यांच्या पदांचा समावेश प्रतीवर्षी अस्थायी पदांच्या मुदतवाढ प्रस्तावात करण्यात यावा.

५) बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेतांना वित्त विभागाच्या दि.२७.०४.२०२२ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५६/सेवा-९ दिनांक २३.०१.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३१११११२१२३९७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAKASH BABAN SURWASE

Digitally signed by PRAKASH BABAN SURWASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=80b7aac85d2bc48d92746fc668ed758d69aeddf95746d0042863b2a0ce71dc1f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6B133E92365A7935768A9BFA0220E77FC95C2726F4A9EB86D8D0C7E623A2B976, cn=PRAKASH BABAN SURWASE
Date: 2024.03.12 16:07:43 +05'30'

(प्रकाश सुरवसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मुंबई.

२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
८. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
११. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१२. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
१३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१४. जिल्हाधिकारी, वर्धा.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा.
१७. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.
१८. ग्रंथपाल, ग्रंथालय, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. उप सचिव (आ.पु.क./व्यय-१३/सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/नोंदणी शाखा प्रमुख, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. निवडनस्ती (वैसेवा-१).

शासन निर्णय क्रमांक: पदनि २६२३/प्र.क्र.२४४/२०२३/वैसेवा-१, दिनांक १२.०३.२०२४ चे सहपत्र

वर्धा **येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास संलग्नित ४३० रुग्णखांटाच्या रुग्णालयाकरीता आवश्यक पदनिर्मिती**

विवरणपत्र-"अ"

नियमित पदे (संवर्गनिहाय)

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	प्रथम वर्ष	व्दितीय वर्ष	तृतीय वर्ष	चतुर्थ वर्ष	एकूण
	गट-अ						
१	वैद्यकीय अधीक्षक	S-२३ : ६७७००-२०८७००	१	०	०	०	१
२	उप वैद्यकीय अधिक्षक	S-२३ : ६७७००-२०८७००	१	०	०	०	१
३	वैद्यकीय अभिलेख अधिकारी	S-२० : ५६१००-१७७५००	१	०	०	०	१
	एकूण		**३**	**०**	**०**	**०**	**३**
	गट-ब						
४	निवासी वैद्यकीय अधिकारी	S-२० : ५६१००-१७७५००	४	३	३	०	१०
५	प्रशासकीय अधिकारी	S-१५ : ४१८००-१३२३००	१	०	०	०	१
६	अधिसेविका	S-१७ : ४७६००-१५११००	१	०	०	०	१
७	जीवरसायन शास्त्रज्ञ	S-१५ : ४१८००-१३२३००	१	०	०	०	१
८	क्लिनिकल सायकॉलॉजीस्ट	S-१५ : ४१८००-१३२३००	१	०	०	०	१
	एकूण		**८**	**३**	**३**	**०**	**१४**
	गट-क						
९	सहाय्यक अधिसेविका	S-१७ : ४७६००-१५११००	१	०	०	०	१
१०	कार्यालयीन अधिक्षक	S-१४ : ३८६००-१२२८००	३	०	०	०	३
११	समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय)	S-१४ : ३८६००-१२२८००	२	२	०	०	४
१२	भौतिकोपचारतज्ञ	S-१४ : ३८६००-१२२८००	१	०	१	०	२
१३	व्यवसायोपचारतज्ञ	S-१४ : ३८६००-१२२८००	०	०	१	०	१

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	प्रथम वर्ष	व्दितीय वर्ष	तृतीय वर्ष	चतुर्थ वर्ष	एकूण
१४	परिसेविका	S-१४ : ३८६००-१२२८००	१७	१२	७	४	४०
१५	वरीष्ठ सहाय्यक	S-१३ : ३५४००-११२४००	५	३	१	०	९
१६	अधिपरिचारीका	S-१३ : ३५४००-११२४००	११४	११७	६२	५७	३५०
१७	स्पीच थेरीपीस्ट	S-१३ : ३५४००-११२४००	०	१	०	०	१
१८	आहारतज्ञ	S-१४ : ३८६००-१२२८००	१	०	०	०	१
१९	वरिष्ठ औषधनिर्माता	S-१३ : ३५४००-११२४००	१	०	०	०	१
२०	लघुलेखक (निम्नश्रेणी)	S-१५ : ४१८००-१३२३००	१	०	०	०	१
२१	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	S-१३ : ३५४००-११२४००	५	५	५	०	१५
२२	क्ष-किरण तंत्रज्ञ	S-१३ : ३५४००-११२४००	१	१	२	०	४
२३	इ.सी.जी. तंत्रज्ञ	S-१३ : ३५४००-११२४००	२	१	१	०	४
२४	बाष्पपात्र परिचर	S-६ : १९९००-६३२००	१	०	०	०	१
२५	व्रणोपचारक	S-५ : १८०००-५६९०००	०	१	०	१	२
२६	औषधनिर्माता	S-१० : २९२००-९२३००	७	३	०	०	१०
२७	दंततंत्रज्ञ	S-१० : २९२००-९२३००	०	१	०	०	१
२८	वरिष्ठ लिपीक	S-८ : २५५००-८११००	९	४	४	३	२०
२९	विजतंत्री	S-८ : २५५००-८११००	१	०	०	०	१
३०	प्रयोगशाळा सहाय्यक	S-७ : २१७००-६९१००	२	२	०	०	४
३१	क्ष-किरण सहाय्यक	S-७ : २१७००-६९१००	२	२	२	०	६
३२	कनिष्ठ लिपिक	S-६ : १९९००-६३२००	८	४	२	०	१४
३३	वस्त्रपाल	S-६ : १९९००-६३२००	२	०	०	०	२
३४	वाहनचालक	S-६ : १९९००-६३२००	२	२	०	०	४
३५	स्वच्छता निरिक्षक	S-८ : २५५००-८११००	०	०	१	०	१
	एकूण		**१८८**	**१६१**	**८९**	**६५**	**५०३**
	एकत्रित एकूण नियमित पदे (गट-अ + गट-ब + गट-क)		**१९९**	**१६४**	**९२**	**६५**	**५२०**

शासन निर्णय क्रमांक: पदनि २६२३/प्र.क्र.२४४/२०२३/वैसेवा-१, दिनांक १२.०३.२०२४ चे सहपत्र

वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास संलग्नित ४३० रुग्णखांटाच्या रुग्णालयाकरीता आवश्यक पदनिर्मिती

विवरणपत्र-"ब"

बाह्यस्त्रोताने

अ.क्र.	पदनाम	प्रथम वर्ष	व्दितीय वर्ष	तृतीय वर्ष	चतुर्थ वर्ष	एकूण
३६	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	२	२	०	०	४
३७	बाष्पपात्र परिचर	१	१	०	०	२
३८	सुरक्षा निरिक्षक	१	०	०	०	१
३९	स्वच्छता निरिक्षक	१	०	१	०	२
४०	विजतंत्री	०	१	०	०	१
४१	प्रयोगशाळा सहाय्यक	२	०	२	०	४
४२	दुरध्वनी चालक	२	२	०	०	४
४३	कनिष्ठ लिपिक	४	३	३	०	१०
४४	शिंपी	२	०	०	०	२
४५	नळ कारागीर	१	०	०	१	२
४६	जोडारी	०	१	०	०	१
४७	सुतार	१	०	१	०	२
४८	वाहनचालक	२	०	०	०	२
४९	मुकादम	१	१	०	०	२
५०	स्वयंपाकी	३	२	०	०	५
५१	शस्त्रक्रियागृह सहाय्यक	५	९	२	४	२०
५२	न्हावी	१	१	०	०	२
५३	परिचर	३६	२४	२	८	७०
५४	कक्ष सेवक, कक्ष आया, महिला आया	३८	४४	२१	१७	१२०
५५	सफाईगार	६४	६८	२५	१८	१७५
५६	सुरक्षारक्षक	१३	१२	१०	०	३५
	एकूण	**१८०**	**१७१**	**६७**	**४८**	**४६६**